नाशिकमध्ये अपक्ष लढणार शांतिगिरी महाराजांची भूमिका

■ नाशिक

नाशिक लोकसभा मतदारसंघातून अपक्ष लढण्यावर ठाम असल्याचे शांतिगिरी महाराजांनी स्पष्ट केले आहे. या निवडणुकीसाठी त्यांनी केलेले आठ दिवसांचे अनुष्ठानही पूर्ण झाले असून महाराजांच्या भक्तांनी निवडणूक लढण्याची तयारी केली आहे. अनुष्ठानानंतर त्यांची त्र्यंबकेश्वर शहरामध्ये मोठी मिरवणूक काढण्यात आली. या माध्यमातून शांतिगिरी महाराजांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. 'खूप केले नेत्यांसाठी आता लढू बाबांसाठी', अशा आशयांचे फलक भक्तांच्या हातांमध्ये होते.

नाशिकमध्ये आपल्याला उमेदवारी देण्यात यावी, या मागणीसाठी शांतिगिरी महाराजांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. महायुतीतील अनेक नेत्यांची भेट घेत शांतिगिरी महाराजांच्या भक्त परिवाराने नाशिक लोकसभा मतदारसंघावर आपला दावा सांगितला होता. मात्र, महायुतीच्या वतीने शांतिगिरी महाराजांना ठोस आश्वासन देण्यात आले नाही. या मतदारसंघात हेमंत गोडसे हे विद्यमान शिवसेना खासदार आहेत. ते शिंदे गटात गेले आहेत. राष्ट्रवादीनेही ही जागा माजी मंत्री छगन भुजबळ यांच्यासाठी मागितली आहे. त्यावरही अद्याप निर्णय झालेला नाही. महायुतीच्या उमेदवारांच्या चर्चेतून शांतिगिरी महाराजांचे नावही मागे पडले असून आता शांतिगिरी महाराजांनी अपक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

शांतिगिरी महाराजांचा नाशिकमध्ये व इतर जिल्ह्यांमध्ये मोठा भक्तपरिवार आहे. याआधी त्यांनी संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्या निवडणूकीत त्यांचा पराभव झाला होता. महाराजांच्या उमेदवारीचा फायदा तेव्हा इम्तियाज जमील यांना झाला होता. आताही शांतिगिरी महाराजांच्या उमेदवारीचा फटका नेमका कोणत्या गटाला बसणार याची चर्चा आहे.

आता क्यू आर कोड लावूनच हापूस आंब्याची विक्री होणार

■ रत्नागिरी

गेल्या काही वर्षांपासून कर्नाटकातील अगदी हापूससोबत साधर्म्य असलेला आंबा हापूसच्या नावाखाली विक्रेत्यांकडून खपवला जात आहे.त्यामुळे आता शेतकऱ्यांसोबतच ग्राहकांनाही फायदा व्हावा यासाठी कोकण हापूस आंबा उत्पादक शेतकरी व विक्रेते सहकारी संस्थेने क्यूआर कोड लावूनच हापूसची विक्री केली जाणार असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्रातील कोकणच्या हापूस आंब्याला जीआय हे भौगोलिक मानांकन फार पूर्वीच मिळाले आहे. कोकणच्या हापूस आंब्याची एक विशिष्ट ओळख आहे आणि तो ग्राहकांनाही विशेष भावतो. त्यामुळे आता कोकण हापूस आंबा उत्पादक शेतकरी व विक्रेते सहकारी संस्थेकडून राज्यातील हापूस उत्पादक शेतकऱ्यांना क्यूआर कोड दिले जाणार आहे.या क्यूआर कोडमुळे संबंधित गुणवत्तापूर्ण अस्सल हापूस आंब्याची ग्राहकांना ओळख होण्यास मदत होणार आहे. या क्यूआर कोडच्या माध्यमातून त्या आंब्याची पॅकिंग तारीख, खराब होण्याची तारीख म्हणजे एक्सपायरी डेट, तसेच संबंधीचे उत्पादक शेतकऱ्याची सविस्तर माहिती मिळणार आहे. त्यामुळे आता अस्सल हापूस आंब्याला चांगला मान मिळणार असून शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे.

पिंपरीत वादळ-वाऱ्यात होर्डिंग्ज पडल्यास जबाबदारी मालकांची

कारवाई करू पिंपरी पालिकेचा इशारा

■ पिंपरी

शहरात विविध ठिकाणी जाहिरात होर्डिंग्ज महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाकडे मंजूर करून उभारलेले आहेत. मात्र, अवकाळी पावसात वादळ, वारा मोठ्या प्रमाणात येत असतो. या वादळात कुजलेले, गंजलेले आणि कमकुवत झालेले जाहिरात फलक कोसळण्याची शक्यता असते. त्यामुळे कमकुवत, कुंजलेले जाहिरात होर्डिंग्ज तत्काळ हटवण्यात यावेत, अन्यथा जाहिरात फलकांचे स्ट्रक्चर पडून जीवित किंवा वित्तहानी झाल्यास संबंधित मालक, चालकाला जबाबदार धरून कारवाई करण्यात येईल, असा इशारा सह-आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिला.

महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाच्या वतीने जाहिरात होर्डिंग्ज चालक, मालक यांची बैठक मुख्य प्रशासकीय इमारतीत घेण्यात आली. जाहिरात फलक पडू नये म्हणून त्या घटना टाळण्यासाठी विविध उपाययोजना राबवण्यासाठी सूचना करण्यात आल्या.

यावेळी सह-आयुक्त चंद्रकांत इंदलकर, उपायुक्त संदीप खोत, संबंधित विभागांचे कर्मचारी उपस्थित होते. महापालिका हद्दीतील काही जाहिरात फलक हे महापालिका परवानगीकरीता प्रलंबित आहेत. ही बाब उच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे. तसेच सर्व जाहिरात फलकांची सादर केलेली स्ट्रक्चर स्टॅबिलिटी पुन्हा सन २०२४-२५ एप्रिल अखेरपर्यंत तपासून घेण्याबाबत सूचना बैठकीत देण्यात आल्या. महापालिका हद्दीमध्ये असणाऱ्या सर्व जाहिरात फलकधारकांनी उभारण्यात आलेल्या फलकांचे स्ट्रक्चर मजबूत आहे का याची खातरजमा करणे गरजेचे आहे. जर स्ट्रक्चर कमकुवत असेल तर ते त्वरित हटवण्यात यावे. येत्या काही दिवसांत वादळ, वारा किंवा जोरदार पावसाने स्ट्रक्चर पडून जीवित किंवा वित्त हानी झाल्यास त्यास जाहिरात फलकधारकास जबाबदार धरण्यात येणार आहे.

पिक-अप गाडी नदीत कोसळली
दोघांचा जागीच मृत्यू! तिघेजण गंभीर

■ नंदूरबार

अक्कलकुवा तालुक्यातील गमनचा उमरपाडा येथील देवनदीच्या खाडीत पिक-अप गाडी पडून दोन जण जागीच ठार झाले,तर तीन जण जखमी झाले.हा भीषण अपघात आज बुधवारी सकाळी घडला. जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या भीषण अपघातातील मृतांची नावे राजू ओंकार बारेला (३०), रा. कर्जाना, ता. चोपडा, जि. जळगाव व पोपट दत्तू सोनवणे (४०), रा. नाशिक अशी आहेत.तर जखमींमध्ये गाडीतील चालक कैलास पाटील (रा. नाशिक) याच्यासह ज्ञानेश्वर उत्तम वाघ,रा. कुंजर, ता. चाळीसगाव, सुनील बड्या पावरा,रा. खर्डी खुर्देचा पाटीलपाडा,ता. धडगाव यांचा समावेश आहे. याबाबत चालकाविरुद्ध मोलगी पोलिसांत गुन्हा दाखल झाला. नाशिक येथील कैलास पाटील हा पिक-अप गाडीमधून मजूर घेऊन अक्कलकुवा तालुक्यातील पिंपळखुटा येथे जात होता. यावेळी पिंपळखुटा ते गमनचा उमरपाडा रस्त्यावर चालक कैलास पाटीलने गाडी भरधाव चालविल्याने त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी थेट देवनदीच्या खाडीत कोसळली.यात राजू आणि पोपट सोनवणे या दोघांचा जागीच मृत्यू झाला.गाडीतील चालक पाटील, ज्ञानेश्वर वाघ आणि सुनील पावरा हे गंभीर जखमी झाले.

चार राजकीय पक्षांच्या पोस्ट सोशल मीडियावरुन हटवल्या

■ मुंबई

देशामध्ये लोकसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. दरम्यान निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर सोशल मीडियावरून काही राजकीय पक्षांच्या पोस्ट हटवल्या गेल्या आहेत. निवडणूक आयोगाने आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोस्ट हटवण्याचे आदेश दिले होते.

आयोगाच्या आदेशानंतर एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून काही राजकीय पक्षांच्या पोस्ट हटवल्या गेल्या आहेत. यामध्ये वायएसआर काँग्रेस, आम आदमी पार्टी, तेलगू देसम पार्टीचे चंद्राबाबू नायडू आणि बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या पोस्टचा समावेश आहेत. आचारसंहितेचे उल्लघंन झाल्यामुळे निवडणुकीच्या कालावधीत या पोस्ट हटवण्यात आल्या आहेत. निवडणूक आयोगाने १० एप्रिल रोजी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मला मेल पाठवत या पोस्ट हटवण्यास सांगितले होते. त्या अनुषंगाने कारवाई करत या पोस्ट हटवण्यात आल्या आहे.

रासायनिक खतांच्या गोण्यांवरून पंतप्रधानांचे
चित्र हटवावे! खत विक्रेत्यांची मागणी

■ रत्नागिरी

रासायनिक खतांच्या गोण्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चित्रे आहेत. लोकसभा निवडणुकीसंबंधी आचारसंहितेचा फटका यातून बसत असल्याने हा अडसर दूर करावा, अशी मागणी खत विक्रेत्यांकडून करण्यात आली होती. मात्र, त्याला प्रतिसाद न मिळाल्याने आता ऐन खरीपाच्या हंगामात पहिल्या टप्प्यात खत विक्री करताना विक्रेत्यांची अडचण होऊ लागली आहे.

शेतातील पिकांच्या जोमदार वाढीसाठी रासायनिक खतांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. या रासायनिक खतांवर शासन सबसिडी देत असते. ती सबसिडी बंद केल्याने खतांच्या गोणींच्या किमतीत मागील अनेक वर्षांपासून सातत्याने वाढ होत आहे. खतांचे दर कितीही वाढले तरी शेतकर्यांना घ्यावीच लागतात. खतांच्या गोणीवर शासनाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र छापले आहेत, त्या छायाचित्र असलेल्या गोण्या दुकानदार अनेक वर्षांपासून विक्री करीत आहेत. मात्र, आता लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्याने राजकीय पक्ष, त्यांची चिन्हे आणि त्यांच्या फोटो असलेली कोणतीही वस्तू, बॅनर, नाव आणि फोटो असलेल्या कोणत्याही साहित्याने जाहिरात होईल, असे करू नये अथवा वापरू नये, असे स्पष्ट आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. परिणामी आयोगाच्या आदेशानुसार नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र गोणीवर असल्यामुळे खतांची उपयुक्तता तसेच मागणी असूनही शेतकर्यांना विकता येत नसल्याने दुकानदारांची अडचण झाली आहे.

रोहित पवारांच्या मातोश्रीही निवडणूक मैदानात उतरल्या

■ बारामती

आमदार रोहित पवारांच्या मातोश्री सुनंदा पवार यांनी बारामती मतदारसंघातील उमेदवारी अर्ज घेतला आहे. त्यामुळे सुनंदा पवार बारामतीतून लोकसभा लढणार का, अशा चर्चा सुरु होती. बारामती लोकसभा मतदारसंघातून शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळेंचा अर्ज बाद झाला तर खबरदारी म्हणून सुनंदा पवार यांचा अर्ज भरला जाणार आहे.

शरद पवार गट आणि अजित पवार गटासाठी बारामती लोकसभा मतदारसंघ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. बारामतीतून अजित पवार गटाने सुनेत्रा पवार आणि शरद पवार गटाने सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र या ठिकाणी कोणताही दगाफटका होऊ नये, यासाठी सुनेत्रा पवारांबरोबर अजित पवार देखील बारामती लोकसभा मतदारसंघातून डमी उमेदवार म्हणून अर्ज दाखल करणार आहेत. यासोबतच आता सुनंदा पवार देखील बारामतीतून डमी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. बारामतीत दोन्ही गटाकडून डमी अर्ज घेतल्याने याठिकाणी मतदारसंघात नवा ट्विस्ट येणार का, अशा चर्चा सुरु आहेत.

एकनाथ खडसे यांना जीवे मारण्याची धमकी

■ मुंबई

राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांना जीवे मारण्याची धमकी देणारे फोन आले. खडसे यांच्या घरी चार वेगवेगळ्या नंबरवरून कुख्यात गुंड छोटा शकीलच्या नावाने हे फोन आल्याचे सांगण्यात येते. याप्रकरणी जळगावच्या मुक्ताईनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एकनाथ खडसे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, सोमवारपासून काल रात्रीपर्यंत मला धमकीचे फोन येत आहेत. आम्ही तुम्हाला मारू, तुमचा जीव घेऊ अशी धमकी फोनवरून देण्यात येते. हा नंबर ट्रेस केल्यानंतर एक अमेरिका आणि एक उत्तर प्रदेशातील असल्याचे उघडकीस आले. याबाबत पोलीस स्थानकात मी तक्रार दाखल केली आहे. पोलीस आता या प्रकरणीचा तपास करत आहेत. तपासात काय समोर येते ते पाहावे लागेल. या आधी देखील मला असे धमकीचे फोन आले होते. गेल्या काही दिवसांपूर्वी कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम याच्या पत्नीशी फोनवर संभाषण केल्याचा आरोप माझ्यावर करण्यात आला होता, मात्र त्यावेळी देखील तपासात एका व्यक्तीने खोडसाळपणा करत एका सॉफ्टवेअरवरून हा फोन कॉल झाल्याचे दाखवले होते.''

म्हैसूर-अजमेर एक्स्प्रेस रेल्वेला
कराडसह साताऱ्यातही थांबा

■ कराड

दक्षिण- पश्चिम रेल्वेने नव्याने सुरू केलेल्या म्हैसूर -अजमेर साप्ताहिक एक्स्प्रेस रेल्वेला कराडसह साताऱ्यातही थांबा मंजूर केला आहे. रेल्वे प्रवासी संघटनांनी त्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा केला होता. उन्हाळी सुट्टीच्या हंगामासाठी १३ एप्रिलपासून म्हैसूर -अजमेर साप्ताहिक एक्स्प्रेस रेल्वे सुरू करण्यात आली आहे. या गाडीला पश्चिम महाराष्ट्रात मिरज वगळता एकही थांबा नव्हता.त्यानंतर सांगलीला थांबा मिळाला. पण सातारा जिल्ह्यातील कराड आणि सातारा या दोन्ही महत्वाच्या ठिकाणी थांबा नसल्याने स्थानिक प्रवासी नाराज झाले होते. त्यांनी प्रवासी संघटनांच्या माध्यमातून पुणे आणि मुंबई रेल्वे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ईमेलद्वारे निवेदन पाठवले होते.

पुण्यात व्यावसायिकावर गोळीबाराचा प्रयत्न

■ पुणे

मागील काही दिवसांपासून राज्यात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. पुण्यात काल सायंकाळी एका व्यावसायिकावर गोळीबाराचा प्रयत्न केला.

धीरज दिनेशचंद्र आरगडे असे गोळीबारातून बचावलेल्या बांधकाम व्यावसायिकाचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळच्या सुमारास धीरज हे शहरातील जंगली महाराज रस्त्यावर असलेल्या वन प्लस शोरूमजवळ उभे होते. त्यावेळी दोन अज्ञात व्यक्ती दुचाकीवरुन तिथे आले. हल्लेखोरांनी फूड

डिलिव्हरी बॉयसारखे कपडे घातले होते. याशिवाय त्यांनी हेल्मेट देखील घातले होते. शोरुमजवळ उभ्या असलेल्या धीरज यांच्यावर हल्लेखोरांनी दोन वेळा गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बंदुकीतून गोळी न सुटल्याने त्यांचा हा प्रयत्न फसला. त्यामुळे धीरज हे जीवघेण्या हल्ल्यातून बचावले. आरडाओरड झाल्याने आरोपी घटनास्थळावरुन फरार झाले. या घटनेनंतर धीरज आरगडे यांनी तातडीने शिवाजीनगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला.

निवडणुकीमुळे एसआरए कार्यालयातील
सर्वसामान्यांची कामे रखडली

■ मुंबई

वांद्र्यातील एसआरए कार्यालयात दैनंदिन कामानिमित्त येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांची कामे गेल्या महिन्याभरापासून रखडली आहेत. याचे कारण लोकसभा निवडणुकीच्या कामासाठी या कार्यालयातील अंदाजे ५० टक्के कर्मचारी वर्ग जुंपला आहे.

लोकसभा निवडणूक जाहीर होताच एसआरए कार्यालयातील कंत्राटी कामगार वगळता शासनातले प्रतिनियुक्ती असलेले अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक कामाचे दीड महिन्यांसाठी आदेश प्राप्त झाले आहेत. सर्वसामान्य झोपडीधारकांना या कार्यालयाशी संबंधित

दैनंदिन कामे व उर्वरित तक्रारींचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी एसआरए कार्यालयात महिनोमहिने चपला झिजवाव्या लागतात. हा अनुभव नवीन नाही. त्यात आता निवडणूक ड्युटीमुळे दुष्काळात तेरावा महिना, अशी प्रतिक्रिया सर्वसामान्यांकडून व्यक्त होत आहे.

थंड हवेच्या महाबळेश्वरचा पारा ३२ अंशांवर पोहचला

■ महाबळेश्वर

सातारा जिल्ह्यातील 'मिनी काश्मीर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या थंड हवेच्या महाबळेश्वरमध्ये सध्या उन्हाचे चटके जाणवत आहेत.समुद्रसपाटीपासून १३७२ मीटर उंचीवर असलेल्या या महाबळेश्वरमध्ये तापमानाचा पारा ३२ अंशांवर पोहचला आहे. महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण असल्याने देश-विदेशातील भरातील लाखो पर्यटक एप्रिल- मे महिन्यात दाखल होत असतात. याठिकाणी असलेल्या वेण्णा लेकला तर संध्याकाळी मुंबईतील चौपाटीचे स्वरुप येत असते.मात्र यंदा याच महाबळेश्वरच्या तापमानात चांगलीच वाढ होऊ लागली आहे.सकाळी साडेअकरा ते चार वाजेपर्यंत ३२ अंश तर संध्याकाळचे तापमान १८ अंशापर्यंत घसरत आहे. उकाडा कमी करण्यासाठी मुख्य बाजारपेठेत मोठा मंडप टाकला आहे. ऐन उन्हाळ्यात ही स्थिती असल्याने नागरिकांना पुढील महिन्यात भीषण पाणीटंचाईला तोंड द्यावे लागणार.

काही पक्षांनी रामाचे अस्तित्व नाकारले
राज ठाकरेंची रामनवमी दिनी पोस्ट

■ मुंबई

देशभरासह राज्यात आज रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. या रामनवमीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सोशल मीडियावर खास पोस्ट केली आहे. या पोस्टमधून काही पक्षांनी श्रीरामाचे अस्तित्व नाकारले असल्याचे म्हणत राज ठाकरेंनी विरोधकांवर टीका केली आहे.

राज ठाकरेंनी पोस्टमध्ये लिहिले की, श्रीराम नवमीच्या सर्व हिंदू बंधू-भगिनींना मनापासून शुभेच्छा. ज्यांनी नीतिमत्ता, धर्म, शास्त्र, व्यवहार यात स्वतः आखून घेतलेली चौकट कधीच ओलांडली नाही असे भगवान श्रीराम. भारतासारख्या खंडप्राय देशांत ऐक्य घडवणे हे तसे कठीण पण पिढ्यानपिढ्या ज्याला जसा श्रीराम भावला, तसा त्याने तो व्यक्त केला आणि त्यामुळे हा मर्यादापुरुषोत्तम देशाला बांधून ठेवणारी एक शक्ती ठरली. ह्या शक्तीला किंवा तिच्या अस्तित्वालाच नाकारण्याचे काम भारतात काही पक्षांकडून घडले, ते का घडले असेल देव जाणो. धर्म, राजकारण, ईश्वर ह्यांची गल्लत हिंदूधर्मीयांकडून कधीच झाली नाही आणि होणार देखील नाही. ह्याचे कारण श्रीराम असोत भगवान श्रीकृष्ण की शंकर हे माणसाच्या मनातील आदर्शांची, स्वप्नांची आणि त्यागाचे प्रतीक आहे, ती धर्मप्रसाराची माध्यमे नव्हती. असो. पण आज अयोध्येत राममंदिर उभे राहिलेले असताना, आजची श्रीराम नवमी ही माझ्यासाठी विशेष आनंददायी. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून पुन्हा एकदा सर्वांना रामनवमीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

झोळंबे येथे गॅस सिलिंडरचा स्फोट

दोडामार्ग- झोळंबे राऊळवाडी येथील अलका अनंत राऊळ यांच्या राहत्या घरात काल सोमवारी सायंकाळच्या समरस एलपिजी गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. सुदैवाने त्यामध्ये कोणतेही जीवितहानी झाली नाही. मात्र घरातील अनेक वस्तूंचे नुकसान झाले. झोळंबे येथील राऊळवाडी मध्ये अलका अनंत राऊळ या आपल्या मुलासमवेत राहतात. काल सायंकाळ च्या सुमारास त्यांच्या घरातील एलपीजी गॅस सिलेंडरचा अचानक स्फोट झाला.

(परिशिष्ट)
फॉर्म ए
सार्वजनिक उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ,
(कॉर्पोरेट व्यक्तीसाठी नादारी विभेदन प्रक्रिया) विनियम २०१६ च्या नियम ६ अंतर्गत)

राजमिनाक्षी होल्डींग्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्यासाठी

प्रस्तुत तपशिल

१	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	राजमिनाक्षी होल्डींग्स प्रायव्हेट लिमिटेड
२	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेची तारीख	१५-जून-८१
३	प्राधिकारी ज्यांच्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणी करण्यात आली आहे.	कंपनी निबंधक, मुंबई
४	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र. / मयादित दायित्व ओळख क्र.	U65990MH1981PLTC024616
५	कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (असल्यास) पत्ता	५-सी, त्रिशला बिल्डींग, १२२, शेख मेमन स्ट्रीट, मुंबई, महाराष्ट्र ४००००२, भारत
६	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संबंधात दिवाळखोरी प्रारंभाची तारीख	आदेश उदघोषणा : १२/०४/२०२४ रोजी (आयआरपीला आदेश कळविण्यात आला १७/०४/२०२४ रोजी)
७	नादारी विभेदन प्रक्रिया बंद होण्याची अनुमानित तारीख	०९-ऑक्टोबर-२४
८	अंतरिम विभेदन व्यवसायिक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक	श्री. विमल कुमार अग्रवाल IBBI/IPA-001/IP-P00741/2017-2018/12247
९	मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम विभेदन व्यवसायीक म्हणून कार्यरत नादारी व्यवसायीकाचा पत्ता आणि ई-मेल	कार्यालय क्र. ४, तळ मजला, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनच्या जवळ, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ई-मेल : vimal@vpagrawal.in
१०	अंतरिम विभेदन व्यवसायिकासोबत संपर्कासाठी वापरण्यात येणारा पत्ता आणि ईमेल	कार्यालय क्र. ४, तळ मजला, सी विंग, शांती ज्योत बिल्डींग, बालाजी नगर, रेल्वे स्टेशनच्या जवळ, भाईंदर पश्चिम, ठाणे पिन ४०११०१. ई-मेल : cirp.rajminakshi@gmail.com
११	दावे सादर करण्याची अंतिम तारीख	२६-एप्रिल-२४
१२	अंतरिम विभेदन व्यवसायिकाद्वारे निर्धारित, सेक्शन २१ च्या उप - सेक्शन (६ए) च्या कलम (बी) अंतर्गत काही असल्यास, धनकोंचे प्रवर्ग	लागू नाही
१३	प्रवर्गामध्ये धनकोंचे अधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्यासाठी अभिज्ञात नादारी व्यवसायिकाचे नाव (प्रत्येक प्रवर्गासाठी तीन नावे)	लागू नाही
१४	(अ) संबंधित प्रपत्र आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील येथे उपलब्ध आहे :	(अ) https://ibbi.gov.in/downloadform.html (ब) लागू नाही

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने **राजमिनाक्षी होल्डींग्स प्रायव्हेट लिमिटेडची** कॉर्पोरेट नादारी विभेदन प्रक्रिया १२ **एप्रिल,** २०२४ रोजी प्रारंभ करण्याचा आदेश दिला आहे.
राजमिनाक्षी होल्डींग्स प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंना, याद्वारे त्याचे दावे पुराव्यांसोबत २६ **एप्रिल,** २०२४ **रोजी** किंवा तत्पूर्वी अंतरिम विभेदन व्यवसायिकांकडे त्यांच्या मुद्दा क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.
वित्तीय धनकोनी त्यांच्या पुराव्यासोबतचे दावे केवळ इलेक्ट्रॉनिक साधनाद्वारे प्रस्तुत करावेत. अन्य सर्व धनको त्यांचे पुराव्यासोबतचे दावे व्यक्तीशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे सादर करू शकतील.
खोटा किंवा दिशाभूल करणारा दाव्याचा पुरावा सादर केल्यास दंडात्मक कारवाई करण्यास पात्र राहील.
अंतरीम विभेदन व्यवसायिकाचे नाव आणि स्वाक्षरी : विमल कुमार अग्रवाल
दिनांक आणि स्थळ : १८-०४-२०२४, मुंबई

आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी
कल्याण-डोंबिवलीत गुन्हा दाखल

■ कल्याण

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोग व स्थानिक जिल्हा प्रशासनाचे सर्व मतदारसंघांवर बारीक लक्ष आहे. यात कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी पहिला गुन्हा मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली असताना या काळात डोंबिवली पूर्वेकडील कल्याण शीळ रोडवरील परिसरात एका जाहिरात एजन्सीने विनापरवानगी होर्डिंग लावले होते.

''चार कोटी पक्की घरे बांधली आहेत, आणखी बांधली जातील, मोदींची गॅरंटी, पुन्हा एकदा मोदी सरकार स्थापन करा अशा आशयाचे हे होर्डिंग होते. या होर्डिंगबाबत तक्रार आली होती. यानंतर कल्याण डोंबिवली महापालिकेचे सहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या तक्रारीनुसार मानपाडा पोलीस ठाण्यात संबंधित एजन्सीविरोधात आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

ज्यांनी मनसे संपविण्याचा प्रयत्न केला त्यांचा प्रचार कसा करणार?

मनसेचे वैभव खेडेकर यांचे वक्तव्य

■ रत्नागिरी

महायुतीच्या ज्या नेत्यांनी कोकणात मनसे पक्ष संपविण्याचा प्रयत्न केला, महायुतीच्या त्याच नेत्यांचा प्रचार कसा करणार, असा प्रश्न मनसेचे राज्य सरचिटणीस आणि माजी नगराध्यक्ष वैभव खेडेकर यांनी उपस्थित केला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महायुतीला पाठिंबा देण्याची घोषणा केली आहे. मात्र राज ठाकरेंच्या या निर्णयावर मनसेच्या काही पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

वैभव खेडेकर यांनी सांगितले की, राज ठाकरेंनी कार्यकर्त्यांना महायुतीच्या प्रचारात सहभागी होण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, ज्या महायुतीतील नेत्यांनी आमच्यावरती गुन्हे दाखल केले, ज्यांनी कोकणात मनसे हा पक्ष संपवण्याचा विडा उचलला होता, ज्यांनी आमचे व्यवसाय बंद केले, ज्यांनी आम्हाला अनेक महिने तुरुंगात ठेवले, खोटे आरोप करून गंभीर गुन्हे दाखल केले, त्या महायुतीच्या नेत्यांचा प्रचार आम्ही कसा करायचा? २०१९ च्या निवडणुकीवेळी सुनील तटकरे यांचा प्रचार मनसेने प्रामाणिकपणे केला होता. मात्र त्यांच्याकडून गेल्या पाच वर्षात अपेक्षित अशी वचनपूर्ती झालेली नाही. त्याचप्रमाणे मनसेच्या कार्यकर्त्यांना दापोली, गुहागर, तसेच खेड या ठिकाणी जागा वाटपामध्ये अथवा पदांमध्ये देखील बाजूला ठेवण्यात आले आहे. त्यामुळे ज्या महायुतीच्या नेत्यांनी मनसे संपवण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यासोबत काम करणे हे अशक्यप्राय आहे. मात्र तरी देखील आम्ही आमचे पक्षप्रमुख राज ठाकरे साहेब यांचा आदेश मानणारे लोक आहोत. या सर्व कार्यकर्त्यांच्या व्यथा आणि वेदना आम्ही त्यांना प्रत्यक्ष भेटून सांगणार आहोत व त्यानंतर स्पष्ट भूमिका घेऊ.